राज्य सेवा हक्क आयुक्त,कोकण महसुली विभाग या कार्यालयासाठी बाह्ययंत्रणेद्वारे दोन शिपाई पदे भरण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक** : GAD/७९/२०२६-GAD - Lokshahi Din
**हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- ०१ ऑक्टोबर, २०२६**

**संदर्भ:-** १.शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१ डिसेंबर, २०२१६
२. शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, भांखस-२०२१/प्र.क्र.८/उद्योग-४,दि.७ मे,२०२१
३.शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क. दि.२७ एप्रिल,२०२२
४.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/१८ (र.व का.) दि.१७ जून,२०१६
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.आरटीएस-२०२१/प्र.क्र.११/लो.दि.क. दि.०८ जून,२०२३

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र.५ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार शिपाई या संवर्गातील राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयासाठी ६ व प्रत्येक विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयासाठी (कोकण/पुणे/नाशिक/छ.संभाजी नगर/नागपूर/अमरावती) प्रत्येक ३ अशी एकूण २४ पदे मंजूर करण्यात आली आहे. तसेच शिपाई या पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे करून घेण्यास संदर्भाधीन क्र.४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

यानुषंगाने राज्य सेवा हक्क आयुक्त,कोकण महसुली विभाग या कार्यालयासाठी बाह्ययंत्रणेद्वारे दोन शिपाई पदे भरण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य सेवा हक्क आयुक्त,कोकण महसुली विभाग या कार्यालयासाठी बाह्ययंत्रणेद्वारे दोन शिपाई पदे भरण्यास प्रशासकीय व सदर पदांच्या वेतनापोटी होणाऱ्या वित्तीय खर्चास खालील अटींच्या अधीन राहुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दिनांक २७/०४/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

आ) बाह्ययंत्रणेद्वारे शिपाई हे पद घेताना त्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच बाह्ययंत्रणेद्वारे सेवा उपलब्ध करून घेताना प्रचलित कायद्याचा भंग होणार नाही याची काळजी विभागप्रमुख/कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

इ) बाह्ययंत्रणेद्वारे शिपाई या पदांची सेवा संबंधित कंत्राटदार/पुरवठादारा मार्फत घेताना उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक दि.०१ डिसेंबर, २०१६ व दि.१७ मे,२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील अटींचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. उपरोक्त बाबींकरिता होणारा खर्च मागणी क्र. ए-४, २०५२-सचिवालय सामान्य सेवा, ०९२ इतर खर्च, (०३) (०१) महाराष्ट्र सेवा हक्क आयोग (२०५२ ५४४८), १० कंत्राटी सेवा या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००११५२२३११५०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHARATI DINESH DHURI

Digitally signed by BHARATI DINESH DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD IT, 2.5.4.20=AC65E55BC2F86EC37C6F25108B6605BC20E71B4742DD20D7E8F5E14CDA6A2A7F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6B3C122EDC26AC3532130D69CD06C9664E8A139B9A532752E240A4851A8C9D3C, cn=BHARATI DINESH DHURI
Date: 2026.10.01 15:23:51 +05'30'

**( भारती दि. धुरी )**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,नवीन प्रशासकीय इमारत,मंत्रालयासमोर,मुंबई
२. राज्य सेवा हक्क आयुक्त,कोकण महसुली विभाग,कोकण
३. महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर
४. महालेखापाल,लेखा व अनुज्ञेयता,महाराष्ट्र-२,नागपूर
५. सह-सचिव,राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,कोकण
६. उप-कोषागार अधिकारी,कोकण भवन,सी.बी.डी. बेलापूर, जि.ठाणे
७. कार्यासन अधिकारी/कार्या.आ.पु.क, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती,कार्यासन लोकशाही दिन कक्ष,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई